**कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीस मुदतवाढ देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-२०२४/प्र.क्र.०९/मावक**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०००३२.

दिनांक :- २५ ऑगस्ट, २०२६.

<u>वाचा</u>: -

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मआसु-२०२३/प्र.क्र.०३/१६-क, दि.०७.०९.२०२३.

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-२०२४/प्र.क्र.०९/ मावक, दि.२५.०१.२०२४.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मआसु-२०२३/प्र.क्र.०३(भाग-१)/आरक्षण-५ (१६-क), दि.१२.०२.२०२५.

४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-२०२४/प्र.क्र.०९/ मावक, दि.२९.०८.२०२५.

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मआसु-२०२३/प्र.क्र.०३/(भाग-१)/आरक्षण-५ (१६-क), दि.२५.०६.२०२६.

<u>प्रस्तावना</u>: -

राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करणे तसेच तपासणीअंती पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहीत करण्याकरिता वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मा. न्यायमुर्ती श्री. संदिप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्यास अनुसरून कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली वाचा क्र.२ येथील शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीचा कालावधी दि.३०.०६.२०२६ रोजी संपुष्टात आलेला आहे.

वाचा क्र.५ येथील शासन निर्णयान्वये मा.न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीस दि.३०.०६.२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळी जुळविण्याचे कामकाज अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे वाचा क्र.२ अन्वये तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या वंशावळ समितीस अध्यक्ष, मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेंखाली दि.०२.०६.२०२६ रोजी संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या नवव्या बैठकीत दि.३०.०६.२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरून कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता

प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्याची कार्यवाही करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्याची कार्यवाही करण्याकरिता तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली वाचा क्र.२ येथील शासन निर्णय, दि.२५.०१.२०२४ अन्वये गठित समितीस दि.०१.०७.२०२६ ते दि. ३०.०६.२०२७ या एक वर्षाच्या कालावधीपर्यंत याद्वारे मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर समितीस वाचा क्र.२ येथील शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक साकेतांक २०२६०८२५१२१७१३४७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATISH M KHAIRMODE

Digitally signed by SATISH M KHAIRMODE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSAD, 2.5.4.20=A6351A2E14339ED095CDA2A544AF43DE4B681AFA9A5B92D3AD62EC4726EBEBAB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79208454FA5609FCBFBE8A59A44EC2402F387AA627CD8748B6D2CFDDF68B76C6, cn=SATISH M KHAIRMODE
Date: 2026.08.25 12:19:13 +05'30'

**(सतीश खैरमोडे)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण व अल्पसंख्यांक व औफाक) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. मा. न्यायमूर्ती श्री. संदिप शिंदे (निवृत्त) समिती, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त, महसूल विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग).
११. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१२. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व पशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
१३. जिल्हाधिकारी (सर्व).
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१५. पोलीस अधीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय (सर्व)
१६. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)
१७. सह सचिव/ उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती कार्यासन मावक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.